# बीए प्रथम वर्ष
# अभ्यास पत्रिका तिसरी -निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास
# विषय काव्य म्हणजे काय ?

डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे
 कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार

# काव्य

- **काव्य** - हा शब्द संस्कृत कविशब्दापासून साधलेला आहे.  कवि म्हणजें शहाणा, विचारी मनुष्य, ऋषि असा मूलार्थ बसून पुढें त्याला पद्यकार असा अर्थ आला.  कल्पनेचे बोल, अंतःशक्तीची खळबळ व मानववंशाच्या प्रगतीला सहाय्यक अशा श्रेष्ठ व आद्य मानवी सामर्थ्यांपैकी एक, अशा व्यापक दृष्टीनें काव्याकडे पाहिल्यास भौतिक शास्त्रांप्रमाणेंच काव्यानें जगांत एक महत्वाची कामगिरी बजाविली आहे असें दिसून येईल.  इंग्लंडसारख्या कांही राष्ट्रांच्या वाङ्मयांत तर काव्याचेंच प्राबल्य असतें.  कांही कांही कवींनांहि हेंच महत्व आलेलें दिसतें.

  वेदांसारखी जागतिक व राष्ट्रीय काव्यें ज्ञानकोशांत स्वतंत्रपणें विवेचिलेली आढळतील.  मोठमोठ्या कवींची चरित्रेहि ज्ञानकोशांतें घेतली आहेत. निरनिराळ्या भाषांतील काव्य त्या त्या भाषावाङ्मयांत दिलेंच आहे.  तेव्हा या ठिकाणी काव्यावर थोडें सामान्य विवेचन, व संस्कृत आणि मराठी काव्यासंबंधी सामान्य टीका पहाण्यास मिळेल.  हा विषय इतका व्यापक व भानगडीचा आहे की, यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे.  तथापि संक्षेपरूपानें पुढील विवेचन केलें आहे.

# काव्य म्हणजे काय ?

- काव्याची व्याख्या करणें अत्यंत कठिण आहे.  कोणत्याहि वाङ्मयांतील व्याख्या समाधानकारक वाटणार नाहीं हें खास.  थोडक्यांत कल्पना द्यावयाची म्हणजे भावना आणि लय यांनी युक्त असलेल्या भाषेंत उच्चारलेले मानवी मनाचे मूर्त आणि चतुर असे जे बोल, त्यांनां काव्य म्हणतां येईल.  जर एखादी साहित्योक्ति मग तिचा विषय कोणताहि असो, हृदय उचंबळण्याला लावीत नसेल तर तिला काव्य हें नांवच शोभणार नाही, एवढें तरी सर्वांना पटेल.  जें कांही कवीला सांगावयाचें असेल तें त्यानें स्पष्टपणें मूर्तस्वरूपांत मांडलें पाहिजे.  एरव्हीं त्याच्या कल्पना लोकांनां कळणार नाहींत हें उघड आहे.  तसेंच काव्यनिपुणाला धंदोबद्ध भाषेंत कविता करण्याची साहजिकच स्फूर्ति होते.  कांही टीकाकार म्हणतात म्हणतात कीं, काव्याला छंदोबद्ध किंवा लयात्मक रचना आवश्यक नाही.  दुसऱ्या कांहीच्या मतें गद्यरचनेला लागणारें भावनात्मक व बौद्धिक जीवन काव्यालाहि लागत असून शिवाय त्याला लयात्मक जीवनहि अत्यावश्यक आहे.
- काव्याचें शरीर किंवा त्याची रचना मोठ्या कुशलतेनें केली असली पहिजे. तसेंच त्यांत कल्पकता असावी. कवीच्या भोंवती एक विशिष्ट वातावरण असून त्यांतून तो जगाकडे पाहतो व काव्य म्हणतो. या वातावरणाला काव्य-कल्पना म्हणतां येईल. खरें काव्य प्रसविण्याला कवीचा आत्मा कांही काळ स्वत:ला विसरून ब्रह्मानंदी बिलीन झाला पाहिजे. असे काव्यसंबंधी तात्त्विक विचार नेहमीं ऐकूं येतात.

# काव्य व इतर कला यांतील संबंध -

- कांही टीकाकार काव्याला चित्रकला व मूर्तिशिल्प यांची दासी बनवितात तर १९ व्या शतकांतील संगीतकलाभिज्ञ वाग्नेरच्या अनुयायांसारखे लोक त्याला संगीतकलेची परिचारिका म्हणतात. ज्यांच्यात कलाविषयक ज्ञान पूर्णपणें प्रगट झालें होतें, त्या प्राचीन ग्रीक लोकांनी संगीत व गद्य यांमध्यें काव्याला स्थान दिलें होतें.

  रोमन लोकांत काव्य म्हणजे गाणें, ही जुनी कल्पना रूढ झालेली वारंवार दिसून येते. काव्य व संगीत या दोन कलांत अधिक मैत्री आहे हें उघड दिसतें; पण पुष्कळ वेळा उत्तम कवीहि संगीतानभिज्ञ असल्याचें आपण पहातो. काव्यविवेचकांनां तर संगीताचें फारसें ज्ञान नसतें.

- गद्यरचना व काव्य यांसंबंधी बोलतांनां कोलरिजनें एकदां असें ठांसून सांगितलें कीं, काव्याचा खरा विरोध गद्याशीं नसून शास्त्रांशीं आहे. कसेंहि असलें तरी एवढें निश्चित आहे कीं, गद्य कितीहि उत्कट व भावनामय बनविलें तरी त्याचा लगाम नेहमी तर्कशास्त्राच्या हातीं असतो, म्हणजें बांधून ठेविलेल्या विमानाप्रमाणें तें पृथ्वी सोडून जाणें खरोखरीच शक्य नाही उलट ज्ञानाच्या साहित्याशीं काव्याचा कांही संबंध नाही. मानवी आत्म्याशीं संबंध आणला जाईपर्यंतच्या मजकुराला काव्यांत जागा मिळत नाही. ट्रॉयवर चालून येणाऱ्या वीरांचें बल, ऐश्वर्य व अभिमान दाखवीत असेल, तर केवळ गलबतांची यादीहि काव्यमय ठरेल ! संगीत आणि काव्य यांमधील संबंधांत ज्याप्रमाणें संगीतांतून जितकें जास्त उसनें घेतां येईल, तितकें घेणारा व छंदामधून जितकें कमी टाकतां येईल तितके टाकणारा तो सर्वश्रेष्ठ पंडित असें ठरतें. त्याचप्रमाणें गद्यरचना आणि काव्य यामधील संबंधांत, जो गद्यामधून जास्तीत जास्त उसनें घेणारा व पद्यामधून कमींत कमी टाकणारा तो सर्वश्रेष्ट मानिला जातो. प्रत्येक कवि स्वयंस्फूर्तीनें या गोष्टी करीत असतोच व या गद्यपद्यांसंबंधांत दोन्ही बाजूंनां कांही नुकसान येतें. या बाबतीत हल्लीच्या कवीचे तरी दोन वर्ग पडतात. एक, सौंदर्यहानि करून आलापाला प्राधान्य देणारा; व दुसरा, आलापाची हानि सोसून सौंदर्याला प्राधान्य देणारा. याप्रमाणें काव्य हें गद्याच्या साम्राज्यावर स्वारी करितें म्हणावें, तर गद्यहि कधी कधी काव्यप्रवेश आक्रमितें. तेव्हां काव्य करणें निराळें व गद्य, संगीत यांसारख्या कलात्मक विषयांवर ग्रंथ निर्माण करणें निराळें आहे यांत शंका नाही. तथापि या कलांमध्यें परस्परविरोध मुळींच नाही.

- छंदसकलेवरील संगीतकलेचें जें वर्चस्व दिसतें त्यांतील महत्वाचा मुद्दा असा कीं, संगीतांत एकतानतेची व्याप्ति मोठी असते. लयाच्या दृष्टीने काव्य जरी संगीताच्या मागे पडतांनां दिसलें तरी,भावना उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यामध्ये आहे हें विसरून चालणार नाहीं. या भावना, विचारांत विलीन झाल्या म्हणजें काव्याची गद्यकलेशी प्रत्यक्ष स्पर्धा सुरू होते. अर्थाचें स्पष्टीकरण करण्यासाठी ध्वनीचा उपयोग करून संगीतकलेपेक्षांहि जास्त असें मानवी आत्म्याचें पूर्ण दिग्दर्शन काव्याला करिता येते.

  सर्व लयांमध्यें निसर्गाचा लय हा सर्वांत खोल आहे. हा लय म्हणजेच जीवनाचा लय होय. हा गद्य व पद्य या दोहोंतहि अंतर्निविष्ट करितां येतो. इंग्रजी बायबलसारख्या गद्यग्रंथांत हा दिसेल. शेक्सपियरसारखे कवी पद्यांत हा लय स्फुरतात. इतर लयांप्रमाणें हा नियमबद्ध असणारच, पण याचे नियम मात्र लिहून काढतां येणार नाहीत, तर पक्ष्यांच्या आलापात, वृक्षपर्णांच्या कुजबुजण्यांत व समुद्र आणि वायु यांच्या आक्रंदनांत ऐकावयांस मिळेल. गद्य किंवा पद्य कोठेंहि हा निसर्गलय समाविष्ट झालेला असो, तो भाषांतरितां येतो यांत शंका नाही. मनुष्याच्या एकाकित्वाविषयी मनूचें पुढील वचन याच प्रकारचें आहे.

- 'प्रत्येक मनुष्य जगांत एकटा जन्मतो, एकटा मरतो, सत्कृत्याबद्दल बक्षीस तो एकटा मिळवितो व दुष्कृत्याबद्दल शासनहि एकटाच भोगितो. तो मेल्यानंतर त्याचें शरीर मोडून पडलेल्या झाडाप्रमाणें पृथ्वीवर पडते, पण त्याचे सद्‌गुण त्यांच्या आत्म्याबरोबर जातात. म्हणून मनुष्याने सद्‌गुण कमावून जतन करावेत, म्हणजे प्रवासाला अत्यंत कठिण अशा अंध कारांतून जाण्याला त्याला एक अखंड मित्र मिळेल.

  येथें भावना व अर्थ यांचें आपोआप चलन होऊन उत्पन्न झालेला लय जगांतील प्रत्येक वाङ्‌मयांत भाषांतररिता येईल.

  चित्रकला व मूर्तिशिल्प यांच्याशी काव्याची तुलना करतां असें दिसून येतें की, निसर्गाच्या नकलेसाठी काव्यांत जें माध्यम योजावें लागतें तें नेहमी शब्दांचेंच असूं शकते. पण काही प्रसंग असे असतात कीं, ते शब्दांनी कधीहि वठवितां यावयाचे नाहीत. या बाबतीत काव्यकला लंगडी ठरते. तेव्हां शिल्पचित्र - कलांप्रमाणें काव्यकलेला भावनांची उत्कटता वठवितां येत नसली तरी भावनांची अनेक प्रकारची अदलाबदल चांगली दर्शवितां येते.

# काव्यकलेंतील विविधप्रकार :-

- सर्व राष्ट्रांच्या काव्यवाङ्मयांतून एकच प्रवृत्ति दिसून येते; कमी जास्तपणाचाच फरक कायतो आढळेल काव्यकल्पनेंत जे दोन अगदी भिन्न प्रकार आहेत. ते म्हणजे (१) शेक्सपियर, होमर वगैरेंत उत्कृष्टपणें दिसणारी काव्यकल्पना, व (२) डांटे, मिल्टन, शेलेसारख्या कवींत आढळणारी काव्यकल्पना. पहिला वैयक्तिक किंवा वीणाकाव्यानें मुळींच नियमित नसून एक श्रेष्ठ नाट्यप्रबंध म्हणून दिसतो; याला पाहिजे तर केवळ 'नाट्य कल्पना' म्हणावें. दुसऱ्यांत कमी अधिक वैयक्तिक किंवा वीणाकाव्यप्रवृत्ति नियामक म्हणून असते; याला सापेक्ष 'नाट्य' कल्पना म्हणावें. स्तोत्रें, गीतें, शोकगीतें, भावगीतें या सर्वांनां सापेक्षकल्पनेची जरूरी असते. बहुतेक काव्यप्रबंधांत तें वरवर पाहिल्यास केवळ कल्पनोद्गम दिसलें तरी ही सापेक्षकल्पनाच अंतरंगांत वावरत असते. आशिया खंडांतील बहुतेक सर्व वाङ्मयांतून केवळ कल्पनेचा अभाव दृष्टीस पडतो. खरें नाट्य प्रसविण्याची मनःप्रवृत्ति फक्त यूरोपांत सांपडेल असें कांही पाश्चात्य पंडित छातीठोकपणें सांगतात. विश्वांतील अतर्क्य चमत्कार, दैवाच्या अद्भुत लीला व अघटित घटना यांसारख्या गोष्टी आशियाखंडांतील कवीच्या डोक्यांत खेळत असतात. या प्रसंगांत सापडणाऱ्या पात्रांच्या अंगचा चमत्कार किंवा कर्तबगारी त्यांनां दिसत नाही. परंतु ती पाश्चात्य कवींनां कळते; म्हणून त्यांनी आकिलीझ, ओडेसिअस, हेलेन, प्रायम यांसारखी पात्रें निर्माण केलीं असें ते म्हणतात.

- सापेक्ष व केवळ कल्पनांत फरक कसा कीं, सापेक्ष कल्पना कल्पित परिस्थितींत कवीच्या स्वतःचें अस्तित्वं जागृत ठेविते; तर केवळ कल्पना त्या कल्पित परिस्थितींत कवीहून निराळ्या व विशेष व्यक्ति कवीद्वारें आपल्यापुढें ठेवते. सापेक्ष कल्पनेचे कवी बाह्यसृष्टि सामान्यपणें रंगवितात, तर केवळ कल्पनेचे कवी निसर्गाशी स्पर्धा करून सामान्यावलोकनाबरोबरच सृष्टीचें विशिष्टावलोकनहि करितात.  हें खरें धरून चालल्यास आपणाला काव्याचें व कवींचें वर्गीकरण करण्यास जागा मिळेल.  सर्व कवी गायक असतात.  या गायकांचे तीन वर्ग पडतात; शुद्ध वीणागायक - यांपैकी प्रत्येक आपल्या एका आवाजानें एकच सूर काढितो; महाकवि हे वृत्तान्त निवेदक व अर्धनाट्य कवी असून आपल्या एकाच आवाजानें अनेक सूर काढतात; व तिसरा वर्ग खऱ्या नाट्यकवींचा हे अनेक आवाजांनी सर्व सूर गातात.

  एक दोन प्रकारांखेरीज काव्यकलेचे सर्व प्रकार सापेक्ष काल्पनेनें पोसलेले असतात.  नाट्यकल्पना ही मात्र प्रत्पक्षपणें केवळ कल्पनेंत येते.  ईलियडसारखें ग्रीक महाकाव्यहि यांत थोडेंबहुत येऊं शकेल.

# संस्कृत प्राकृत -

- काव्य या शब्दाचा अर्थ कविता असा असून उच्च कल्पनांचा अवलंब करून लिहिलेली कविता असा काव्याचा विशेषार्थ आहे.  प्रत्यक्ष वस्तुविषयापेक्षां तीवरील कल्पनेला अधिक महत्व देणें हा असल्या काव्यांचा विशेष होय.  भारतीय राजांच्या दरबारी या प्रकारच्या काव्यांची विशेष वाढ झालेली असल्यानें साहजिकच अशा काव्यास बंदिगीतें किंवा सूतकाव्यें असें नांव देण्यास हरकत नाहीं.

- रामायण व महाभारत यांमध्यें आढळणारी व पुढें विशेष लोकप्रिय झालेली प्राचीन वीररसपर कविता आरंभी तरी बहुधा या बंदिगीतांच्या अथवा सूतकाव्यांच्या स्वरूपाची होती. सूत अथवा भाट हे असल्या कवितेचे पुरस्कर्ते असून ते राजदरबारीं राहून नृपस्तुति करीत असत. चक्षुर्वैसत्यं या न्यायानें वीरांची कृति पाहण्यास स्वतः समरभूमीवर जाऊन ते योध्यांच्या कृतीसंबंधी काव्य करीत असत. यांचा पंडितजनांपेक्षा योध्यांच्या निकट परिचय असे. वीरांचें सारथ्य करून ते लढाईत प्रत्यक्ष भाग घेत. हीं वीररसप्रधान काव्यें जन्मास आली तो काळ सांस्कृतिकदृष्ट्या फारसा प्रगत झालेला नव्हता. कां की, त्या काळांत युद्धें, आर्ष चालीरीती, शिकार, द्यूत इत्यादि सर्व गोष्टी प्रचलित असून राजांनां यांपासून मोठी करमणूक वाटत असे. उत्सवाचे प्रसंग मोठालीं संमेलनें, विजयोत्सव, सत्रादि प्रचंड यज्ञसमारंभ अशा विविध प्रसंगी हे भाट लोक आपलें काव्य गात असत. पुढें राजदरबारांत जास्त सांस्कृतिक प्रगति होऊं लागल्यानंतर ब्राह्मण संप्रदायांत वाढलेल्या व ब्राह्मणांशी पांडित्यांत अहमहमिका बाळगणाऱ्या विद्वान कवींनीं भाटांची जागा काबीज केली. हे लोक केवळ ऐकीव माहितीवरून युद्धांचीं वर्णनें करीत व त्यांचे लिहिणेंहि ठराविक साच्याचें असे. नावीन्य, कल्पना व प्रतिभा या गुणांपेक्षां पांडित्य व भाषास्वारस्य यांकडेच जास्त लक्ष्य देण्यांत येत असे. (प्रासंगिक उपम देऊन आपल्या व्याकरणाचें पांडित्य दाखविण्यास कालिदास सुद्धां कचरत नसें). अत्यंत कृत्रिम कवितेच्या द्वारां आपल्या आश्रयदात्यांची स्तुति गाणारे प्रशंसाकाव्यप्रवीण लोकच काव्यकलाप्रवीण होते. प्रशंसा हा विषय या काव्यरीतीचा प्रथमविषयच असावा व त्याची वाढहि दरबारांतच झालेली होती. ऋग्वेदांत आपणांस गाथा नाराशंसींचा उल्लेख आढळतो. यावरून या काव्यपद्धतीचें, विशेषतः दरबारी काव्यपद्धतीचें मूळ काय होतें हें समजून येईल. कवी जितकें जास्त श्रम घेत, तितक्या प्रमाणांत त्यांस आपल्या कलेचा अधिक उपयोग करावा लागत असे. ज्या मानानें कवींचीं कलात्मक कृति अवघड असलेल्या मानानें राजांनांहि जास्त खुषामत झाल्यासारखें वाटे.

- रामायणांत या तऱ्हेच्या स्तुतिपर कृत्रिम काव्याचें मूळ सापडते. या काव्याचा आदिकवि वाल्मिकी असून रामायण हेंच असल्या काव्याचें उदाहरण होय. या काव्यपद्धतीचा विशेष काय असतो हें महाकाव्यावरून दिसून येतेच. पण संस्कृत काव्याच्या अभिजात युगाचें जें दरबारी महाकाव्य आहे त्यावरून असें दिसते की, वरील दरबारी काव्यरीतीस त्यावेळी पूर्ण भर आला होता. एवढेंच नव्हे, तर वरील दरबारी काव्यानें भावनात्मक कविता, चुटके, नाटकें व कथा इत्यादि वाङ्मय व्यापून टाकून जैन व बौद्ध लोकांच्या धार्मिक कवितेचा प्रांतहि काबीज केला होता.

- असल्या काव्यपद्धतीचे महत्वाचे विशेष खाली दिल्याप्रमाणें आहेत :- उपमा अलंकारांची गर्दी, लांबलचक वर्णनाकडे कल, रजनी, कौमुदी, सूर्योदय व ऋतु यांची ठराविक शब्दचित्रें; असल्या वर्णनांमुळें इतकी जागा अडून जाते कीं, मुख्य काव्यविषयच मुळी मागें पडतो व त्यामुळे एखाद्या महाकाव्याच्या सर्गांतील मजकूर अथवा एखाद्या अद्‌भत कथेचा बराचसा भाग दोन पानांतहि सांगून टाकतां येणें शक्य होतें. जोडयमकें, कृत्रिम वृत्तें, अपरिचित शब्द, अनेकार्थी सामासिक शब्द, श्लेष, शब्दच्छल व कोट्या, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सरळ न बोलतां मुद्दाम कृत्रिम बोलून वळसे घेऊन कूट स्वरूपानें प्रत्येक गोष्टीतून ध्वन्यर्थ काढणें, इत्यादि अनेक गोष्टी असल्या काव्यांत असतात. आनंदवर्धन कवीनेंहि या पद्धतिचा उल्लेख केलेला आहे. एकाच काव्यांतील एक किंवा अधिक शब्दांचे एकसमयावच्छेदेंकरून अनेक अर्थ करणें म्हणजे काव्याची परमावधी होय असें मानलें जात असे.

- बहुधा सातव्या शतकांत होऊन गेलेल्या दण्डि कवीनें आपल्या 'काव्यादर्श' नामक ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, प्रत्येक कवितेस शरीर व अलंकार असे असतात. शरीर म्हणजे शब्दावली होय, व ती अर्थाप्रमाणें वाक्यरूपानें विभागली जाते. गद्य, पद्य व मिश्र असेंहि काव्य असूं शकतें. कवितेला अनेक वृत्ते जरूर असून ती विराम व साक्षरमात्रागणवृत्तांनी युक्त अशी असतात. परंतु वृत्त हें कांही काव्याचें प्रधान अंग नव्हे. काव्य हें गद्य, पद्य व मिश्र असेंहि असूं शकतें, असा भारतीयांचा सिद्धांत आहे. नुस्त्या यमकांनी व वृत्तांनी युक्त असलेली कविता हें काव्य नव्हे एकाद्या शास्त्रीय ग्रंथाला जर छंदोबद्ध स्वरूप दिलें तर त्यास बोधपर कविता असें कोणीहि म्हणणार नाही. व्याकरण, शब्दकोश, वैद्यकीय व ज्योतिषविषयक ग्रंथांनां काव्याचें बाह्य स्वरूप दिले तर ते ग्रंथ काव्य या संज्ञेस पात्र होणार नाहींत. फार तर गद्यापेक्षां पद्याचा अवलंब करण्यानें तो विषय स्मृतीच्या अंकित लवकर होऊं शकेल. परंतु, वराहमिहिरकृत बृहत्संहिता या शास्त्रीय ग्रंथासहि कृत्रिमकाव्य म्हणतां येईल. तसेंच एखाद्या गद्य नवलकथेंत जर भरपूर अलंकार असतील तर छंदोबद्ध महाकाव्याप्रमाणें त्या कादंबरीसहि काव्य असें म्हणतां येईल.

- संस्कृत व अपभ्रंश अथवा प्राकृत भाषेंत काव्य करण्यास कांहीच हरकत नाहीं अशी स्पष्ट लोकसमजूत होती. संस्कृताप्रमाणेंच प्राकृताचाहि उपयोग काव्यें करण्याकरितां भारतीय कवींनीं केलेला आहे. कित्येक वेळां कांही कवींनीं आपली कविता संस्कृत व प्राकृत अशा दोन्ही भाषेंत लिहिली आहे. परंतु प्राकृत काव्य म्हणजे संस्कृतची नक्कल होय हें उघड आहे.

- धन्यवाद